# कृषि व्यवसाय वृध्दी कक्ष (ABGC)

## माहिती

राज्यातील सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतकरी समुहांना कृषी व्यवसाय सुरु करणेसाठी विविध योजना राबविणे, तसेच रास्त दरात सेवा पुरवठा करणे.

**शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी**

- शेतकऱ्यांना अत्यंत कमी खर्चात शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करुन देणे.
- महामंडळाकडे 135 सनदी लेखापाल व कंपनी सचिव यांचे पॅनेल.

**प्रकल्प अहवाल तयार करणे**

- सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या / संस्था व महिला बचत गट यांना स्मार्ट, पोकरा, मॅग्नेट, पी.एम.एफ.एम.ई., समभाग निधी व इतर सर्व शासकीय योजनांकरीता कृषी व पुरक व्यवसायाचे बँकेबल प्रस्ताव तयार करुन देणे.
- वाजवी शुल्क आकारणी.

**इतर सेवा**

- विविध व्यवसायांना आवश्यक परवाने काढून देणे.
- ब्रॅन्डिंग, पॅकिंग तसेच लेबलींगबाबत मार्गदर्शन.
- वित्तीय जोडणीसाठी मार्गदर्शन.
- खरेदीदार, प्रक्रियादार व निर्यातदार यांच्यासोबत बाजार जोडणी.
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होण्यास मार्गदर्शन.
- SMART MAGNET, POCRA प्रकल्प, AIF, PMFME आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी इतर प्रकल्पांसाठी FPO ला मार्गदर्शन करणे.

शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

- एकूण 10 संचालकांचे पॅन कार्ड आणि आधार कार्ड.
- संचालकांच्या जन्मतारखेची माहिती.
- संचालकांचा मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी.
- पत्त्यासाठी कोणत्याही एका संचालकाचे लाईट बिल
- सर्व संचालकांचे बँक स्टेटमेंट पहिले पान आणि चालू महिन्याचे व्यवहार केलेले बँक स्टेटमेंट.
- तालुका कृषी अधिकाऱ्यांनी विहित नमुन्यात दिलेले शेतकरी प्रमाणपत्र.
- शैक्षणिक पात्रतेची माहिती.
- 3 पासपोर्ट आकाराचे फोटो.

शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी शुल्क रु. 35,400/- (अंदाजे).